## प्रकरण दुसरे

## संबंधित साहित्याचे समीक्षण

### २.१ प्रास्ताविक

संशोधकाने संशोधन विषय निश्चित केल्यानंतर तो विषय नेमक्या शब्दात लिहिण्यापूर्वी त्या विषयासंबंधी सखोल माहिती संशोधकास हवी, त्या विषयाचे बारीक-सारीक सर्व पैलू माहित असावयास पाहिजेत. संशोधन विषयावर प्रभुत्व प्राप्त केल्याखेरीज संशोधन प्रक्रिया सुरु करता येत नाही म्हणून संशोधकाने संबंधित साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक असते.

"संशोधकाने संशोधनासाठी जो विषय घेतलेला आहे, त्या विशिष्ट विषयावर तत्पूर्वी संशोधन झालेले नसते, झाले असल्यास ते वेगळ्या परिस्थितीत, वेगळ्या काळात, वेगळ्या दृष्टीकोनातून झालेले असते. त्यामुळे संशोधकास त्या विषयाची माहिती अत्यंत व्यवस्थित हवी, यासाठी संबंधित साहित्याचे परिशीलन करण्याची आवश्यकता आहे." [१]

"संशोधकाने आपल्या विषयाबाबतचे तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, अध्यापन पद्धती, समाजशास्त्र या चार महत्त्वाच्या क्षेत्रातील ग्रंथाच्या अभ्यासाबरोबर संदर्भपुस्तके त्याचे मूलभूत अभ्यासक्रम, मूल्यमापन तंत्र

---

१. वि. रा. भिंताडे. "शैक्षणिक संशोधन पद्धती" [पुणे : नूतन प्रकाशन, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९८९ ], पान नं. ४०.

याचाही अभ्यास संशोधकाने करावयास पाहिजे." [२] या सर्व प्रकारच्या साहित्याच्या समीक्षणाच्या पूरक संशोधकाने स्वत:चा अनुभवही जमेस धरावयास पाहिजे. या साहित्याचा अभ्यास करताना संशोधकाने योग्य उतारे किंवा उता-यांचा सारांश यांची टिपणे करावयास पाहिजेत.

संशोधकाने संशोधन करण्यापूर्वी वरीलप्रकारे जे साहित्य वाचले आहे त्या पायावर संशोधन प्रक्रियेची पुढील इमारत उभी राहणार असते. आपल्या संशोधनासाठी वरील पध्दतीनुसार कोणते साहित्य वाचणे आवश्यक आहे हे संशोधकाने ठरवावे. आपल्या विषयाशी संबंधित सर्व उपलब्ध साहित्य वाचावे, त्याचे मनन करावे व नोटस् काढून ठेवाव्यात. त्यामुळे संशोधन अहवाल लेखन करताना अडचणी येत नाहीत.

"व्यक्तीने जर निवडलेल्या विषयासंबंधी अस्तित्वात असलेल्या संशोधनाचा अधिकाधिक अभ्यास केला तर अधिक आत्मविश्वासाने समस्येसंबंधी त्याला विचार करता येतो. संशोधनाच्या आराखडयामध्ये संबंधित साहित्याचा अभ्यास असा एक विभाग असतो. हा आढावा घेतेवेळी संशोधक पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या समस्येशी संबंधित वाङ्मयाचे सिंहावलोकन करतात. अहवाल, जर्नल्स्, पुस्तके, संशोधक अशा वाङ्मयामध्ये अभ्यास विषयात साम्य, संबंध व अवलंबन विचारात घेतो त्यामुळे त्याचे अंतर्भूत घटकांचे आकलन वाढते. अचूक नेमके बनते.

---

२. भा.गो.बापट. "शैक्षणिक संशोधन", [पुणे : नूतन प्रकाशन, पुणे-३०, व्दितीय आवृत्ती, १९७७], पान नं. १८७.

संशोधकाला प्रश्नाचे उत्तर शोधण्यास कृतीसाठी योग्य मार्गाचा, अधिक उपयोगी वा साधक मार्गाचा अवलंब करुन घेण्यास उपयुक्त होतो." [3]

संबंधित साहित्याचा अभ्यास म्हणजे संशोधन विषयाच्या संबंधात जे महत्त्वपूर्ण ज्ञान उपलब्ध आहे त्याचा सारांश देणे व त्या विषयात उपलब्ध असलेल्या ज्ञानाचा आधार घेऊन त्यापुढील ज्ञानाचा शोध घेण्यासाठी अथवा उपलब्ध ज्ञानाचा नवीन परिस्थितीमधील बदललेला अर्थ विशद करण्यासाठी संबंधित संशोधन विषयाचा पाया भक्कम करण्यासाठी संबंधित साहित्याचे परिशीलन आवश्यक आहे. हे महत्त्वपूर्ण ज्ञान, संशोधन विषयाच्या संबंधातील विविध ग्रंथामध्ये, लेखात उपलब्ध असते. त्यातील योग्य त्या घटकांचे वाचन, चिंतन, मनन व उपयोजन म्हणजेच संबंधित साहित्याचे समीक्षण होय.

संबंधित साहित्याची माहिती अहवाल, ग्रंथ, नियतकालिके, इतर लोकांचे प्रबंध इत्यादीतून संपादन करावी लागते. वरील सर्व गोष्टी फायदेशीर ठरत असल्यामुळे संशोधकाला संशोधनाच्या अभ्यासामध्ये संबंधित साहित्याचा अभ्यास करणे आवश्यक असते.

---

३. प्रा. देशपांडे. "संशोधन पध्दती", [नाशिक : यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक-५, प्रथम आवृत्ती, १९९४], पान नं. ३२.

## २.२ विविध आयोगानी प्रौढ शिक्षणासंबंधी केलेले प्रयत्न

### क] "प्रौढ शिक्षण सल्लागार समिती : इ.स. १९३७ " [४]

या समितीचे अध्यक्ष क्लिफर्ड मॅनशार्ट हे होते. लोकनियुक्त मंत्रिमंडळाने ही समिती नेमली. या समितीच्या शिफारशीनुसार सरकारने राज्य प्रौढ शिक्षण मंडळाची स्थापना केली. तिचे अध्यक्ष श्री एस्.आर. भागवत होते. या समितीच्या आणखी एका शिफारशीप्रमाणे संस्था अगर व्यक्ती यांनी राज्यमंडळाकडे नोंदणी करून घेऊन प्रौढशिक्षणाचे काम करावे त्यांना कामाबद्दल अनुदानही द्यावे असे ठरले. सध्याच्या काळात आर्थिक टंचाईमुळे प्रौढशिक्षणाचे काम साक्षरतेपुरते मर्यादित करावे अशीही समितीने सूचना केली. प्रौढशिक्षणाला काही प्रमाणात या सूचनांमुळे गती मिळाली.

### ख] "सार्जंट अहवाल – युध्दोत्तर विकास योजना : इ.स. १९४४" [५]

सर जॉन सार्जंट हा केंद्रीय सरकारचा शैक्षणिक सल्लागार होता. त्याला सरकारने युध्दोतर शैक्षणिक विकासासंबंधी एक योजना देण्यास सांगितले व त्याने या अहवालात पूर्वप्राथमिक शिक्षणापासून ते विद्यापीठ शिक्षणापर्यंतचा तपशील असा वृत्तांत दिला आहे. एका अर्थाने राष्ट्रीय शिक्षणाचा हा एक विस्तृत व मार्मिक असा अभ्यास प्रथमच करण्यात आला आहे. त्यांच्या सूचनेत त्यानी वीस वर्षात सर्वांना साक्षर करणे गरजेचे आहे असे सांगितले होते.

---

४. श.कृ. सोहोनी. "शैक्षणिक टीपाकोश" [पुणे : प्रकाशक सौ. सुधा शं. सोहोनी, पुणे ३०], प्रथमावृत्ती, १९९३], पृष्ठ क्र. ५७४.

५. कित्ता., पा. नं. ५७८.

ग] "भारतीय शिक्षण मंडळ : इ.स. १९६४ " [६]

डॉ. डी. एस्. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली हा आयोग नेमण्यात आला. यामध्ये भारतीय व परकीय शिक्षणतज्ज्ञ सदस्य म्हणून होते. श्री जे. पी. नाईक हे त्याचे सदस्य सचिव होते. या आयोगाने आपला अहवाल १९६६ साली दिला. प्रौढशिक्षणाबाबतही समितीने सूचना केल्या आहेत.

घ] "ईश्वरभाई जे. पटेल - पुनर्विलोकन समिती : इ.स. १९७७" [७]

या समितीनेही प्रौढशिक्षणासंबंधी विचार केलेला आहे.

च] "राममूर्ती समीक्षा समिती : इ.स. १९९०" [८]

सन १९८६ साली मंजूर झालेल्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे पुनर्विलोक करण्याकरिता श्री विश्वनाथ प्रतापसिंग सरकारने एक नवीन राममूर्ती समिती ७ मे १९९० च्या आदेशाप्रमाणे प्रस्थापित केली. या समितीत श्री राममूर्ती खेरीज इतर सोळा सदस्य होते. या समितीने आपला अहवाल २६ डिसेंबर १९९० रोजी सरकारला सादर केला. हा अहवाल एकूण ४०९ पृष्ठांचा आहे.

---

६. किता., पा. नं. ५८४
७. किता., पा. नं. ५८४
८. किता., पा. नं. ५८४

प्रौढ शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करावी, प्रौढाना शिक्षणाची निकड वाटेल असे वातावरण निर्माण करणे अधिक हितावह आहे असे सुचविले.

ड] "EIGHTH FIVE YEAR PLAN : 1992-97" [9]

Literacy programmes will be launched in districts/regions which are educationally backward or have high concentration of SC / ST population or have low female literacy. By the close of the Eight Plan 345 districts including about two-third of all districts in the educationally backward states would be covered by Total Literacy (TL) compaigns while the centre based approach would be gradually phased out and confined to hilliy, tribal and sparsely populated regions. The targets to be covered during the Eight Plan will be about 10.5 crore (15 - 35 age group).

---

9. J.C.Aggarwal. "HANDMARKS IN THE HISTORY OF MODERN INDIAN EDUCATION", ( Vikas Publishing House Pvt.Ltd. 1983), Page No.425.

## २.३ देशोदेशीचे प्रौढशिक्षण

भारत हा एक विकसनशील देश आहे. भारतामध्ये भाषा, परंपरा, भौगोलिक परिस्थिती यामध्ये विविधता असली तरी शिक्षणाची रचना बहुतांश समान आहे. शिक्षण पद्धती एकमार्गी असून, तत्वश: तिचा भर सर्वांना समान शिक्षण संधी देण्यावर आहे. भारताच्या घटनेनुसार प्राथमिक शिक्षण वयाच्या चौदा वर्षापर्यन्त मोफत द्यावयाचे आहे. भारताच्या घटनेत जरी प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत असले, तरी सर्वदूर त्याचा प्रसार म्हणावा तसा झालेला नाही.

### अमेरिका : प्रौढशिक्षण [१०]

अमेरिकेत प्रौढशिक्षणाची सोय मोठ्या प्रमाणात आहे. कृषि, तांत्रिक व्यवसाय, कला, गृहजीवन, नागरीजीवन इत्यादी विषयांचे प्रगत ज्ञान देण्याची सोय आहे. तीस ते पंचेचाळीस या वयोमर्यादेतील लोक विशेषत: शिकतात. परंतु सर्व प्रौढांना हा शिक्षणक्रम खुला आहे. या कार्यक्रमात शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे व खाजगी संस्था भाग घेतात.

अमेरिकन शिक्षणाचा विशेष असा की, ते आपल्यासारखे साचेबंद नाही की गतानुगतिक नाही तर त्यात प्रयोगशीलता आहे. माणसामधील गुंतवणूक म्हणून शिक्षणावर अमाप खर्च करण्यात येतो.

### ऑस्ट्रेलिया : प्रौढशिक्षण [११]

व्यावसायिक अगर बिन व्यावसायिक शिक्षण प्रौढांनाही

---

१०. शं.कृ.सोहोनी. "शैक्षणिक टीपाकोश", [पुणे : प्रकाशक सौ.सुधा शं. सोहोनी, पुणे-३०, प्रथमावृत्ती, १९९३], पा.नं.५९४.

११. कित्ता., पा.नं.६०२

देण्याची व्यवस्था आहे. विद्यापीठात निरंतर शिक्षणद्वारा विनापदवी शिक्षण देण्याची सोय आहे. राज्यसरकारे व खाजगी संस्था इंग्रजी भाषा वर्ग, साक्षरता वर्ग, माध्यमिक स्तरावरील अभ्यासवर्ग चालवितात त्यामुळे शिक्षण न घेतलेल्यांची सोय होते.

## इराण : प्रौढशिक्षण [१२]

इराणमध्ये सुमारे ४८ टक्के लोक साक्षर आहेत. लोकांना साक्षर करण्याकरिता निरनिराळे प्रयोग चालू आहेत. त्यामध्ये कार्यात्मक साक्षरतेवर भर देण्यात येत आहे.

## ईजिप्त : लोकशिक्षण [१३]

सन १९४४ च्या कायद्यान्वये बारा ते पंचेचाळीस वयाचे पुरुष व बारा ते पंधरा वयाच्या मुली यांना शिक्षण सक्तीचे करण्यात आले आहे. सध्या साक्षरतेचे प्रमाण चाळीस टक्क्यांच्यावर आहे.
शिक्षणाचा जव ळ-जवळ सर्व खर्च मध्यवर्ती सरकार करते.

## कॅनडा : प्रौढशिक्षण [१४]

निरंतर शिक्षण पद्धती सर्व स्तरांवर चालू आहे. पत्रव्यवहार पद्धती सायंशाळा, प्रवासी ग्रंथालये, संग्रहालये, आकाशवाणी, दूरचित्रवाणी यामार्फत शिक्षण दिले जाते.

प्रौढशिक्षण कॅनडात अत्यंत लोकप्रिय झाले आहे. देशात संपूर्ण साक्षरता आहे.

---

१२. कित्ता., पान नं. ६०३
१३. कित्ता., पान नं. ६०३
१४. कित्ता., पान नं. ६०३

कोरिया [दक्षिण] : प्रौढशिक्षण [१५]

कोरियात निरक्षरतेचे प्रमाण बरेच कमी, म्हणजे सुमारे आठ टक्के आहे. तरीही प्रौढांच्या शिक्षणाकरिता चाकोरी बाहेरील शिक्षण योजना आहेत. खेडयातील तरुण वर्गाकरिता अगर स्त्री वर्गाकरिता सायंकालीन वर्ग खेडयांतील शाळेतच घेण्यात येतात. याखेरीज दूरचित्रवाणीचा व आकाशवाणीचा शिक्षणाकरिता खास उपयोग केला जातो.

चीन : प्रौढशिक्षण [१६]

चीनमध्ये भारताप्रमाणेच हा प्रश्न बिकट झाला आहे. सुमारे पाच टक्के कामगारवर्ग आणि तीस टक्के तरुण व मध्यमवयीन शेतकरी अद्यापी निरक्षर आहेत. सुमारे दोन ते तीन वर्षात निरक्षरता नाहीशी करण्याचा चंग बांधला आहे.

जर्मनी : प्रौढशिक्षण [१७]

प्रौढशिक्षणाची खास व्यवस्था जर्मनीत आहे. विविध संस्थामार्फत हे शिक्षण दिले जाते.

पाकिस्तान : प्रौढशिक्षण [१८]

सन १९८१ साली साक्षरतेचे प्रमाण सुमारे तेवीस टक्के होते. त्यात स्त्रियांचे प्रमाण सुमारे अकरा टक्के होते. स्त्री-शिक्षणाच्या बाबतीत

---

१५. कित्ता., पान नं. ६०६
१६. कित्ता., पान नं. ६१०
१७. कित्ता., पान नं. ६१५
१८. कित्ता., पान नं. ६१६

पाकिस्तान हा मागेच आहे. सन १९८१ मध्ये एकूण शिकणा-या मुलांपैकी मुलींचे प्रमाण फक्त अठ्ठावीस टक्के होते. सन १९८५ मध्ये साक्षरता सव्वीस टक्के होती.

धार्मिक शिक्षण सर्व शिक्षण संस्थात सक्तीचे होते.

## भारत : प्रौढशिक्षण [१९]

आज देशात ५२.११ टक्के लोक साक्षर आहेत असे १९९१ ची जनगणना सांगते. त्यातही पुरुषांचे प्रमाण ६३.८६ टक्के व स्त्रियांचे प्रमाण ३९.४२ टक्के आहे. सन १९८९ मध्ये राष्ट्रीय साक्षरता मिशनमार्फत १५-३५ वयोगटातील स्त्री-पुरुषांची साक्षरता १९९५ पर्यन्त किमान ८० टक्के पर्यन्त आणण्याकरिता प्रयत्न सुरु झाले. सन १९९० हे "आंतरराष्ट्रीय साक्षरता"वर्ष होते. त्यानिमित्त राष्ट्रीय साक्षरता मिशनने साक्षरतेचा मोठा कार्यक्रम हाती घेतला. त्याकरिता सरकारने ५५० कोटी रुपयांची तरतुद केली. भारतात साक्षरता मिशनने साक्षरता कार्यक्रम सुरु केला. भारतात साक्षरतेचे प्रयत्न सुमारे ५०-६० वर्षांपासुन चालु आहेत परंतु अद्यापी ४७.८९ टक्के म्हणजे सुमारे एकेचाळीस कोटी लोक देशात निरक्षर आहेत, अशी विचित्र परिस्थिती आहे.

लोकसंख्येच्या बेसुमार वाढीने साक्षरतेची टक्केवारी वाढली तरी निरक्षर लोकांची एकूण संख्या वाढतच जात आहे.

---

१९. कित्ता., पान नं. ६२४.

## २.४ साक्षरता म्हणजे काय ? [२०]

सर्वसाधारणपणे लोकात असा गैरसमज आहे की, साक्षरता म्हणजे निरक्षरांना केवळ कांही अक्षरांची ओळख करून देऊन त्यांना स्वाक्षरी करण्यास शिकविणे.

परंतु संपूर्ण साक्षरता अभियानाचा एवढा मर्यादित उद्देश नाही. तर निरक्षरांना अक्षर ओळख करून देणे, त्यांचे शब्दज्ञान वाढविणे, शब्दाद्‌दारे वाक्ये जुळविणे, वाक्ये वाचणे, अर्थग्रहण करणे व लिहिणे या क्षमता त्यांच्यात निर्माण करणे म्हणजे विचार अभिव्यक्तीसाठी त्यांना सक्षम बनविणे हे अपेक्षित आहे. तसेच त्यांना अंकज्ञान करून देणे. बेरीज, वजाबाकी, गुणाकार भागाकार या गणितातील मूलभूत प्रक्रियांचा परिचय करून देणे आणि रुपये, पैसे, वजनमापे इत्यादी गोष्टींची ओळख करून देणे व दैनंदिन व्यवहारात उपयोगी हिशेब करण्यास सक्षम बनवून त्याच्यात कार्यात्मक साक्षरता निर्माण करणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे.

कार्यात्मक साक्षरता म्हणजे –

१] अक्षरज्ञान व अंकज्ञान या क्षेत्रात स्वावलंबी बनविणे. २] आपल्या परिस्थितीचे आकलन होणे व त्याची कारण मिमांसा करता येणे, आणि विकास कार्यात सहभागी होऊन संघटितरित्या परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करणे. ३] मुख्यत: आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी नवी साधने व कौशल्ये संपादन करण्याची क्षमता निर्माण करणे. ४] राष्ट्रीय एकात्मता, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक समानता, पर्यावरण संरक्षण, अंधश्रध्दा निर्मूलन, छोट्या कुटुंबाचे महत्त्व यासारखी सामाजिक मूल्ये आत्मसात करणे.

---

२०. नांदेड जिल्हा संपूर्ण साक्षरता अभियान, पुस्तक माला, १९९२, पुष्प १ले, शिदोरी [स्वयंसेवकासाठी हस्तपुस्तिका], पान नं. ८.

## २.५ साक्षरतेचा स्तर

साक्षरता अभियानांतर्गत शिकणा-या नवसाक्षरांचा साक्षरता स्तर निश्चित करणे अत्यंत महत्त्वाचे काम आहे. अर्थात नवसाक्षराने किमान क्षमता प्राप्त करण्यासाठी उद्दिष्ट निश्चित करणे आवश्यक आहे.

### स्वाक्षरी पण विचारपूर्वक

सही करता येणे हे मर्यादित व प्रसंगी अत्यंत धोकादायक उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेऊन आपल्याला हा उपक्रम राबविता येणार नाही. तर विचार करुन व बुद्धिला पटल्यानंतरच स्वाक्षरी करण्याची क्षमता प्राप्त करुन देणे हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवावे लागेल.

अक्षरांची ओळख करुन देत असताना प्रत्येक शब्द माझ्या नित्याच्या व्यवहाराशी निगडीत आहे. जे मी शिकत आहे त्याने माझे जीवन अधिक सुकरपणे जगता येणे मला शक्य आहे, असे वाटले पाहिजे. थोडक्यात जीवनोपयोगी शिक्षणाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवूनच अध्ययनाचा स्तर निश्चित करणे आवश्यक आहे.

नवसाक्षराला गोडीतर वाटलीच पाहिजे, त्याशिवाय हे अध्यापन विशिष्ट कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे. त्यासाठी पुढीलप्रमाणे विभागणी करता येईल.

राष्ट्रीय साक्षरता मिशनने ठरविलेल्या निकषानुसार हे स्तर ठरविलेले आहेत.

वाचन, लेखन आणि गणिताचे निश्चित केलेले मापदंड आहेत.

१] वाचन

अ] कुठल्याही पाठातील [गद्य] त्याच्या आवडीचा विषय असलेल्या भागातून पाच मिनीटाला तीस शब्द स्पष्ट व शुद्ध उच्चारणे.

ब] परिवहन संकेत [चिन्ह] फलक सामान्य सुचना आणि नवसाक्षरासाठी प्रकाशित वर्तमानपत्राचे सहजरित्या वाचन करता येणे.

क] आपल्या व्यवसायाशी संबंधित आणि आपल्या समोवताली असलेल्या घटना संबंधीच्या बातम्या समजू शकतो.

२] लेखन

क] दर मिनीटाला सात शब्द समजून लिहणे.

ख] दर मिनीटाला पाच शब्द श्रवण करुन [अनुलेखन] लिहिणे.

ग] दोन शब्दामध्ये विशिष्ट अंतर ठेवणे.

घ] शब्दासाठी असलेली सांकेतीक चिन्ह समजून त्याचा उपयोग करणे.

३] अंकगणित

क] १ ते १०० पर्यंतचे लेखन आणि संख्या वाचन करता येणे.

ख] तीन अंकी संख्या [एक हजाराच्या आतील] पर्यन्तची बेरीज, वजाबाकी [शंभर पेक्षा कमी] गुणाकार आणि भागाकार करणे.

ग] किलोग्रॅम, मीटर, रुपये, पैसे, किलोमीटर आणि क्षेत्रफळ आणि वेळ [घडयाळ] समजणे.

घ] प्रमाणभाग / गुणोत्तर आणि व्याज यासारख्या गणिती कौशल्याचा व्यवहार्य उपयोग समजणे.

या पद्धतीने साक्षरतेचे स्तर ठरविलेले होते.

## २.६ साक्षरतेसाठी जन आंदोलन

जगातील अडतीस टक्के निरक्षर जनता मागासलेल्या विकसनशील देशात आहे. भारतात आज निरक्षरता नाहीसे करण्याचे अनेक प्रयत्न चालू असूनही पन्नास कोटी लोक निरक्षर आहेत असा अंदाज आहे. १९५१ मध्ये निरक्षरांची संख्या तीस कोटी होती, ती १९८१ मध्ये ४३.८ कोटी झाली. भारतासारख्या महान परंपरा असलेल्या आर्यभट्ट, भास्कर, पाणिनी, पातांजली प्रभृतींना जन्म देणा-या देशाची आज काय दुर्दशा आहे ! सर्वात अधिक अशिक्षितांचा देश म्हणून जगात आपण विक्रम साधलेला आहे.

ज्या स्वातंत्र्यासाठी आपल्या वाडवडिलांनी बलिदान केले, ते स्वातंत्र्य बहुसंख्य निरक्षर व पीडीत लोकांच्या दृष्टीने निरर्थक ठरत आहे. महाराष्ट्र राज्यात १९८१ च्या जनगणनेनुसार एका साक्षर स्त्रीमागे दोन निरक्षर स्त्रिया आहेत. त्यासाठीच महाराष्ट्र शासनाने अग्रक्रम देऊन संपूर्ण साक्षरता अभियान मोठ्या प्रमाणात हाती घेतले आहे.

### २.६.१ आजपर्यंतच्या साक्षरता मोहीमेचे यशापयश

पूर्वी जेव्हा सरकारने केंद्र आधारीत साक्षरता कार्यक्रम राबविले तेव्हा त्यामध्ये प्रत्येक केंद्रावर एक संघटक नेमलेला असे. तीस लोकांसाठी एक केंद्र अशी रचना होती. परंतु त्या कार्यक्रमात प्रेरक व संघटक यांच्यात प्रेरणेचा अभाव होता. निरक्षर लोकांतही प्रेरणेचा अभाव आढळून आला. वर्गात येणा-या प्रौढ निरक्षरांना वर्गात आणण्याची पूर्ण जबाबदारी त्या संघटकावर टाकण्यात आली होती. कारण त्या कार्यक्रमात लोकांचा सहभाग नव्हता.

व्यवस्थापकीय प्रोत्साहन अतिशय कमी असल्याने हा कार्यक्रम नेटाने पुढे जाऊ शकला नाही. दुसरा मोठ्या प्रमाणात हाती घेतलेला कार्यक्रम म्हणजे प्रत्येकाने एका व्यक्तीस साक्षर करण्याचा. या कार्यक्रमात सर्व वर्ग विखुरलेले व प्रत्यक्ष पाहणे अशक्य होते. तसेच समाजाला समाविष्ट करणे व निरक्षरांना पुरेसे प्रोत्साहीत करणे अशक्य होते. सामुहिक चैतन्याच्या अभावामुळे हा कार्यक्रमही यशस्वी होऊ शकला नाही.

२, ६. २ संपूर्ण साक्षरता

आज हे अभियान पुढे जात असताना काहीजण प्राथमिक शिक्षणाची आज जी दुर्दशा आहे त्याकडे बोट दाखवतात. शाळा सोडणाऱ्या मुलांची संख्या सतत वाढतच गेली तर निरक्षरतेचा प्रश्न तसाच कायम राहील हे खरे आहे, पण ज्यावेळी गावपातळीवर शेकडो वर्ग सुरू होतील तेव्हा लोकांमध्ये शिक्षणाबाबत जागृती निर्माण होईल व शेकडो पालक आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत जागृत होतील. स्वत: प्रौढ शिक्षण वर्गात हजेरी लावणारे आई-वडील आपल्या मुलांच्या भवितव्याबाबत नक्कीच विचार करायला लागतील व आज हे चित्र शाळा प्रवेशाच्या वेळी पहावयास मिळते.

सरकारला निरक्षरता नाहीशी करण्यासाठी अनेक योजना आखूनही म्हणावे तसे यश आले नव्हते. परंतु केरळमध्ये अर्नाकुलम जिल्हा प्रथम साक्षर करण्यात यश आले व एक आशावादी विचार जनमाणसापर्यन्त जाऊन पोहचला. त्या आधारे संपूर्ण केरळ राज्यात साक्षरतेसाठी "जन आंदोलनाची" आवश्यकता मान्य झाली. काही लोकांनी असा विचार मांडला की, केरळमध्ये साक्षरतेचे प्रमाण पहिल्यापासूनच जास्त आहे. परंतु भारतातील अतिशय मागासलेल्या जिल्ह्यात उदाहरणार्थ मिदनापूरदुर्ग व ओरिसा राज्यातल्या अत्यंत

अविकसीत जिल्ह्यात अनेक यशस्वी प्रयोग झालेल्या सर्व अनुभवांवरुन एक सिध्द झाले की "अर्नाकुलम"चा नमुना स्थानिक व भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन उपयोगात आणल्यास तो यशस्वी होतो.

देशात विविध ठिकाणी या अभियानाचे स्वरुप जनआंदोलनाच्या रुपाने पुढे नेत असताना याची काही ठळक वैशिष्टये लक्षात आली. पूर्वीच्या योजनेशी तुलना करताना या जनआंदोलनाची ही मूलभूत वैशिष्टये कोणती हे समजून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

२. ६. ३ साक्षरता अभियानाची वैशिष्टये

१] या अभियानामध्ये पूर्वीच्या योजनेसारखा एकादा छोटा भाग उदाहरणार्थ - खेडे, साक्षरतेकरिता न घेता व्यापक प्रमाणात संपूर्ण जिल्हा घेण्यात आला आहे.

२] संपूर्ण समाजाचा कोणत्या ना कोणत्या स्वरुपात सहभाग आहे.

३] प्रामुख्याने स्वयंसेवी स्वरुप एक महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

४] नोकरशाही व स्वयंसेवी संस्था यांचा परस्पर समन्वय, सहकार्य लाभलेले आहे.

५] अत्यंत दृढ निष्ठा व जबर इच्छाशक्ती अपेक्षित आहे.

६] सहभागी होणा-यांच्या सामाजिक दृष्टीकोनातील बदल अपेक्षित आहे.

७]"नैराश्यातून आशावादाकडे" आणि आशावाद संसर्गजन्य व झपाटयाने पसरणारा आहे, अशी अभियानाची भूमिका आहे.

८] सामुदायिक आनंद ही अभियानाची एक उपलब्धी आहे.

## २.७ जन आंदोलनाचे फलित

या साक्षरता मोहीमेने साक्षरतेपेक्षा अधिक पुढच्या चळवळी प्रगत होण्याची क्षमता आपल्यात असल्याचे सिध्द केले आहे. यामुळे लोकांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन,आशावाद, व्यक्तीस्वातंत्र्य व आत्मविश्वासाची भावना निर्माण झालेली आहे व ही चळवळ अक्षर शिकण्याच्या कितीतरी अधिक पुढे गेली आहे. ही चळवळ निरक्षराला दारिद्र्य, दैववादापासून मुक्त करून त्यांच्यात उज्वल भविष्यकाळाविषयी आत्मविश्वास निर्माण करत आहे. ही चळवळ मध्यम वर्गाची निराशेतून व औदासिन्यातून सुटका करेल. आज गाव पातळीपर्यंत रुंदावत गेलेली आर्थिक विषमतेची दरी व त्यामुळे सामाजिक तणाव याला ही चळवळ छेद देत आहे.

या जन आंदोलनाचे दुसरे वैशिष्टय म्हणजे साक्षरता मोहीम प्रत्येक गावागावातून पोहचली आहे. एका विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेला स्वयंसेवकांचा प्रचंड ताफा संस्कारीत होईल. विकासाच्या कुठल्याही प्रक्रियेत जर लोकांचा प्रत्यक्ष सहभाग व स्थानिक पातळीवर नियोजन नसेल तर ती प्रक्रिया कुंठीत होते. या अभियानाच्या नात्याने वस्ती-वस्तीवर, गाव पातळीवर प्रत्येक ठिकाणी एक कार्यकर्त्यांचा संच व जाळे तयार होईल. जो लोकांमध्ये जागृती निर्माण करील व स्थानीक पातळीवर लोकशाही भक्कम करण्याचे काम करील.

या अभियानात गावपातळीवर जे लाखो लोक सहभागी झाले आहेत त्यांच्यामध्ये शब्द लिहिण्याच्या बरोबर सामाजिक चेतना जागृत करणे व सांस्कृतिक जीवन उन्नत करण्यासाठी एक वेगळा प्रयत्न चालू आहे.

हळूहळू समाजाची मानसिकता बदलत जाणे व साक्षरतेच्या कार्यक्रमानंतर विकासाच्या अनेक योजनांमध्ये त्यांचा प्रत्यक्ष सहभाग मिळवून देणे हे साक्षरोत्तर धोरणाचा एक भाग आहे.

दलित, कष्टकरी, गरीब, अडाणी जनता जेव्हा आपले हक्क व अधिकार जाणून घेईल. विकासाच्या योजनेच्या अंमलबजावणीत पुढाकार घेईल, तेव्हा साक्षरतेचे मूळ उद्दिष्ट व त्याचा आपल्याला अभिप्रेत असलेला आशय लोकांच्या प्रत्यक्ष वृत्तीत उतरला आहे असे आपण म्हणू शकू. खेडयातील लाखो महिला आरोग्य, पर्यावरण, स्त्री-पुरुष समानता, देश संस्कृतीची नवीन परिभाषा वापरायला लागतील तेंव्हा ती परिवर्तनाची सुरुवात असेल व अशी सुरुवात झालेली आहे. दूर डोंगरापलिकडे आपल्या जात्यावर साक्षरतेची ओवी म्हणणारी माता आपल्या मुलाला शिक्षणापासून वंचित ठेवणार नाही. बेकार तरुण जेंव्हा साक्षरता स्वयंसेवक होईल तेंव्हा त्याचे गुणगुणनेही बदललेले असेल. ही फक्त सुरुवात आहे.

## २.८ संपूर्ण साक्षरता अभियानाचे स्वरूप आणि कार्यपद्धती

मागील अनेक वर्षात प्रौढ शिक्षण आणि साक्षरता ह्यांच्या कार्याचा अनुभव आशाजनक नाही.

सन १९७८ मध्ये भारत सरकारने प्रौढ साक्षरतेचा मोठा कार्यक्रम हाती घेतला. त्यानंतर सन १९८८ मध्ये राष्ट्रीय साक्षरता मिशनची स्थापना करण्यात आली. या राष्ट्रीय साक्षरता मिशनने लोक विज्ञान चळवळ केरळ शास्त्र साहित्य परिषद आणि भारत ज्ञान विज्ञान जथा यांच्या अनुभवाच्या सहाय्याने संपूर्ण साक्षरतेसाठी सामाजिक मोहिमेची पद्धती

अवलंबिण्याचे ठरविले. ही सामाजिक मोहीम "संपूर्ण साक्षरताअभियान सोलापूर" या नावाने जिल्ह्यात चालू आहे. या मोहिमेची कार्यपद्धती, स्वरूप आणि व्याप्ती खालील प्रमाणे आहे.

१] संपूर्ण साक्षरता मोहिमेचे स्वरूप

सोलापूर जिल्हा संपूर्ण साक्षरता मोहिमेमध्ये जिल्हा हा घटक मानला आहे त्यामुळेच "सोलापूर जिल्हा संपूर्ण साक्षरता अभियान" समितीचे अध्यक्ष मा. जिल्हाधिकारी साहेब आहेत. या जिल्हा समितीमध्ये या अभियानातील सहभागी समित्यांची रचना साधारणत: पुढीलप्रमाणे आहे.

२] जास्तीत जास्त समाजाचा सहभाग

या सामजिक मोहिमेमध्ये समाजातील वेगवेगळ्या स्तरातील लोकांचा सहभाग मिळविणे आवश्यक आहे आणि तो मिळविण्याचा प्रयत्न या अभियानाने बराचसा केलेला आहे. सोलापूर जिल्हा साक्षरता अभियान समितीच्या वतीने जिल्हा पातळीपासून ते ग्राम/वाडी पातळीवरील समित्यामध्ये समाजातील वेगवेगळ्या स्तरावील लोकांना सामावून घेण्याचा प्रयत्न केला आहे.


३] प्रशिक्षण योजना

या सामाजिक मोहिमेमध्ये मोठ्या प्रमाणात स्वयंसेवक मिळवणे. "आपल्या जिल्ह्यांत १५ ते ३५ वयोगटात निरक्षरांची संख्या ३,८३,३९० असून त्यापैकी निरक्षर पुरुष १,०१,४२९, महिला २,८१,९६१ आहेत तर केवळ सोलापूर शहरात १५ ते ३५ वयोगटातील निरक्षरांची संख्या ४०,००० आहे. त्यामध्ये ३०,००० स्त्रिया आहेत. या ४०,००० निरक्षरांना

शिकविण्यासाठी ४००० स्वयंसेवकांची गरज होती. म्हणजेच दहा निरक्षरांमागे एक स्वयंसेवक या प्रमाणात आपल्याला स्वयंसेवक तयार करावे लागले. या ४००० स्वयंसेवकांना प्रशिक्षण देण्यासाठी साधारणत: तीस स्वयंसेवकांमागे एक प्रशिक्षकाची आवश्यकता होती. म्हणजेच सोलापूर शहर साक्षरता अभियानात जवळपास १३४ प्रशिक्षक संख्या होती या १३४ प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी साधन व्यक्तींची गरज होती व या साधन व्यक्तींच्या प्रशिक्षणासाठी मुख्य साधन व्यक्तींची गरज होती व या सर्वांना ४ + ४ + २ + २ दिवसांचे प्रशिक्षण दिले गेले.

४] मूल्यमापन आणि देखरेख व्यवस्थापन

सहभागी समित्या, जिल्हा प्रशासन, मोहिमेतील कार्यकर्त्यांची यंत्रणा यांना फारच महत्त्वाचे स्थान आहे.



## २.९ साक्षरता मोहिमेत सुशिक्षितांची भूमिका

प्रौढ शिक्षण साक्षरता अभियानासंबंधी मोहीम सध्या देशभर जोरात सुरु आहे. व्यापक पातळीवर हा कार्यक्रम देशभर जोरात आहे. परंतु हा कार्यक्रम काय आहे, त्याची उद्दिष्टे काय आहेत, याची फारशी जाणीव सुशिक्षितांना नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. साक्षरतेचा हा जो कार्यक्रम राबविला जात आहे तो संपूर्ण साक्षरतेसाठी राबविला जात आहे. कारण यापूर्वीही साक्षरतेबाबत कार्यक्रम राबविले गेले परंतु ते तितकेसे यशस्वी झाले नाहीत. त्यामुळे याच गतीने आपण जर साक्षरता कार्यक्रम राबविला तर इ.स. २००० पर्यन्त जगातील सर्व निरक्षरापैकी निम्मे निरक्षर एकट्या भारतामध्ये असतील असा अंदाज आहे. म्हणून भारतामध्ये साक्षरता अभियान ही एक प्रकारची चळवळ राबविण्याचे ठरवले आहे व राबविले जात आहे.

या साक्षरता अभियानामध्ये निरक्षरांना केवळ लिहायला, वाचायला शिकवणे हाच एक उद्देश नाही तर त्यांच्यामध्ये जाणीव जागृती करणे, त्यांना त्यांचे हक्क, त्यांची कर्तव्ये समजावून देणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यांच्यावर होणारा अन्याय बंद करण्यासाठी साक्षरतेच्या माध्यमातून त्यांना अधिक सक्षम करणे हे महत्त्वपूर्ण मानले गेले आहे. कारण आधुनिक युगाचा विचार केला तर असे दिसून येते की जागतिक उदारीकरण सर्वत्र येत आहे आणि या स्पर्धेच्या युगात टिकून राहायचे असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही. त्यामुळे जनतेचे कल्याण व देशाचा सर्वांगिण विकास यास्तव साक्षरता अभियान सर्वांनी राबविणे अत्यंत आवश्यक आहे.

ज्ञान हेच बळ व आरोग्य हीच संपत्ती आहे व या माध्यमातून मानवी साधन सामग्रीचा विकास होऊ शकतो म्हणून साक्षरतेच्या माध्यमातून दारिद्र्य निर्मूलन करणे हे एक महत्त्वपूर्ण उद्दिष्ट आहे.

आपण सोलापूर जिल्हयाचा विचार केला तर असे दिसून येते की, सोलापूर जिल्हयामध्ये चार लाख निरक्षर आहेत यासाठी जिल्हयामध्ये एक विश्वस्त समिती व एक कार्यकारी समिती नियुक्त केली आहे. तसेच गावपातळीपर्यंत ही वेगवेगळ्या समित्या स्थापन झालेल्या आहेत. सध्या ४०,००० स्वयंसेवक व २,००० चांगले प्रशिक्षणार्थी कार्यरत आहेत. या सर्वांच्या माध्यमातून वातावरण निर्मिती, तसेच साक्षरतेसंबंधीचे सर्व कार्य केले जात आहे.

परंतु हा कार्यक्रम जिल्हा परिषदेअंतर्गत प्राथमिक व माध्यमिक शाळामधून त्यांच्याकरवी मोठया प्रमाणात राबविला जात आहे त्यामुळे इतरांना किंवा इतर शिक्षितांना हा कार्यक्रम काय आहे याची जाणीव नाही. या बाबतीत सुशिक्षितांचीच उदासिनता दिसून येते. परंतु हा कार्यक्रम केवळ सरकारी कार्यक्रम नाही तर तो तुमच्या आमच्या सर्वांचाच कार्यक्रम आहे. सर्वांनी पुढाकार घेऊन हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी आपण स्वयंप्रेरीत होऊन आपल्या बांधवांना देशवासियांना हात देऊ या. आपआपल्या क्षेत्रात साक्षरतेसंबंधी आपल्याला जे काही करता येईल ते करण्याचा आपण प्रामाणिक प्रयत्न केला पाहिजे व हेच आपले राष्ट्रीय कर्तव्य आहे.

## २.१० सारांश

निरक्षरता निर्मूलनाच्या बाबतीत मोठी अडचण म्हणजे आपले सामाजिक निष्क्रियत्व, साक्षरतेचे दृश्य परिणाम अल्पावधीत ध्यानात येत नाहीत म्हणून साक्षरतेचे महत्त्व लोकांना चटदिशी पटत नाही हे एक

समाजशिक्षण आहे. यासाठी योग्य वातावरण निर्मिती करून हे अभियान सोलापूर शहरात राबविण्यात आले. या साक्षरता अभियानात प्राथमिक व माध्यमिक शाळांतील तसेच महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी, शहरातील स्वयंसेवी संघटना, कार्यकर्ते सहभागी झाले होते. जर एवढयाच लोकांनी हा कार्यक्रम यशस्वी करावयाचे ठरविले तर त्यांच्यावरच त्याचा बोजा पडेल व चळवळ ही पूर्णपणे यशस्वी होण्यास जास्त कालावधी लागेल. यासाठी एका सुशिक्षित व्यक्तीने जर एका निरक्षरास साक्षर करावयाचा संकल्प करून तो सिध्दस नेला तर कुणावरही जास्त बोजा न पडता आपण निरक्षरता निर्मूलनाचे उद्दिष्ट सहज गाठू शकतो.